महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रं. - 02462-244474
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
E-mail Id- pronanded@gmail.com

---

जा. क्रं./ प्रेस नोट / 206 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2024 / दिनांक :– 11 / 06 / 2024

---

# 1)जबरी चोरी :–

**1)नांदेड ग्रामीण** :–दिनांक 07.06.2024 रोजी चे 02.30 वा. चे सुमारास, **वाजेगाव बायपासचे समोर लालवाडीचे आलीकडे ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्यांचा मुलगा हे दिनांक 07.06.2024 चे रात्री 02.30 वा. चे सुमारास त्यांची मोटार सायकल क्रमांक एमएच–26 / सीएच–1109 वर बसुन त्यांचे वासरी गावाकडे जाण्याकरीता वाजेगाव बायपास मुदखेड रोडवर लालवाडीचे आलीकडे आला असता मोटार सायकलच्या पाठीमागुन एका मोटार सायकलवर यातील नमुद दोन पगडी धारक आरोपीतांनी वय अंदाजे 20 ते 22 येवुन संगणमत करून फिर्यादीची मोटार सायकल आडवुन हातातील तलवारीने फिर्यादीचे उजव्या मांडीवर मारून हरामखोर जो है सो जलदी निकाल म्हणुन फिर्यादीच्या पॅन्टच्या खिशातील विवो कंपणीचा मोबाईल किंमती 17,000 / –रू चा व पाटीमागच्या खिशातील पॉकेट ज्यामध्ये रोख रक्कम 12,000 / –रू व लायसंन्स, अधार कार्ड असलेले जबरीने काढुन घेतले. दुसऱ्या आरोपीने खंजर हातात घेवुन मुलाच्या शर्टच्या खिशातील ओपो कंपणीचा मोबाईल किंमती 17,000 / –रू चा जबरीने काढुन घेतला. असा एकुण 46,000 / –रू चा मुद्येमाल जबरीने चोरून घेवुन जिवे मारण्याची धमकी देवुन दोन्ही आरोपी नंबर नसेलेल्या मोटार सायकलवर बसुन निघुन गेले. वगैरे **फिर्यादी बापुराव खोब्राजी कल्याणे, वय 38 वर्षे, व्यवसाय पेट्रोलपंप मॅनेजर रा. वासरी ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 473 / 2024 कलम 394, 506, 34 भादवी सह 4 / 25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / श्री कोरे, मो. नं. 8888836607** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगर** :–दिनांक 10.06.2024 रोजी चे सकाळी 05.45 वा. चे सुमारास, **पुष्पनगर नांदेड येथे,** यातील फिर्यादी बाई ही मॉर्नींग वॉक करीत असतांना यातील अनोळखी दोन आरोपीतांनी संगणमत करून मोटार सायकलवर पाठीमागुन येवुन पाठीमागे बसलेल्या इसमांनी फिर्यादीचे गळयातील मिनी गंठण किंमती 20,000 / –रू चे जबरीने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी सुशिला दिगांबरराव पाटील, वय 64 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. पुष्पनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 239 / 2024 कलम 394, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि / श्री नागरगोजे, मो. नं. 9545648770** हे करीत आहेत.

# 2)मोबाईल चोरी :–

**इतवारा** :– दिनांक 09.06.2024 रोजी चे 17.30 वा. चे सुमारास, **घोडा गल्ली ते देशमुख हॉस्पीटल जवळ इतवारा बाजार नांदेड येथे,** फिर्यादी हा घोडा गल्ली ते देशमुख हॉस्पीटल इतवारा भागात भाजीपाला घेण्यासाठी आठवडी बाजारमध्ये गेले असता त्याच्या शर्टच्या वरच्या खिशात ठेवलेला रियलमी कंपणीचा मोबाईल किंमती 16,048 / –रू चा कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी अब्दुल आला पि. अब्दुल सत्तार, वय 52 वर्षे, व्यवसाय असिस्टंट रा. नगरेश्वर मंदिर रोड जवळ मिठीका शेर जवळ इतवारा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 207 / 2024 कलम 379, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 664 हाक्के, मो. क्रं. 8380000664** हे करीत आहेत.

# 3)विवाहीतेचा छळ :–

**हदगांव** :– सन–2014 पासुन ते आज पावेतो, **फिर्यादीचे राहाते घरी मौ. वसई ता. औंढा जि. हिंगोले ह. मु. मौ. अंबाळा ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझे माहेरहुन प्लॉट घेण्यासाठी एक लाख रूपये घेवुन ये म्हणुन चारीत्र्यावर संशय घेवुन शिवीगाळ केली व थापड बुक्यांनी मारहाण करून तिचा शारिरीक व मानसीक छळ केला. वगैरे **फिर्यादी 30 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगांव** गुरनं 149 / 2024 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 1099 गायकवाड, मो.क्रं. 8888636700** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :–

**मुदखेड :–**दिनांक 07.06.2024 रोजी चे 20.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरासमोर अंगणात मौ. पिंपळकौठा चोर ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस आमच्या मुलीस का शिवीगाळ करता म्हणुन शिवीगाळ करून लोखंडी गजाळीने उजवे हातावर मारून गंभीर दुखापत केली. साक्षीदार यांना थापडा बुक्याने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी बाबुराव शंकर पुट्टेवाड, वय 60 वर्षे, व्यवसाय शेती रा. पिंपळकौठा ता. मुदखेड जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरन 95/2024 कलम 326, 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2232 पवार, मो. नं. 7776088897** हे करीत आहेत.

## 5)प्राण्यास क्रुरतेने वागणुक :–

**1)विमानतळ :–** दिनांक 09.06.2024 रोजी चे 19.15 वा. चे सुमारास, **हातोडा चौक ते शिवमंदीर जाणारे रोडवर आसरानगर पाटीजवळ नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररीत्या महिंद्रा कंपणीची लोंडीग गाडी वाहन क्रमांक एमएच–03/एएच–7726 किंमती 3,50,000/– रू मध्ये दोन गोवंश जातीचे बैल किंमती 50,000/–रू असा एकुण 4,00,000/–रू मुद्येमाल निष्काळजीपणे वाहन चालवुन वेदना होईल अशा रितीने कोणतीही काळजी न घेता गाडी मध्ये भरून जनावरांना क्रुर वागणुक देवुन कोंबुन कतलीसाठी नेत असतांना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री मोहन अमरसिंग राठोड, ने. पोस्टे विमानतळ** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 179/2024 कलम 5(अ)5(ब),9 प्राणी संरक्षण अधिनियम कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2372 ताटे, मो. नं. 9970391886** हे करीत आहेत.

**2)बारड :–** दिनांक 09.06.2024 रोजी चे 19.50 वा. चे सुमारास, **मौ. त्रिकुट गावचे शिवारात ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररीत्या त्यांच्या ताब्यातील छोटा हाती टाटा एस वाहन क्रमांक एमएच–26/एडी–6876 किंमती 2,00,000/–रू मध्ये तीन गोवंश जातीचे बैल किंमती 1,25,000/–रू चे असा एकुण किंमती 3,25,000/–रू वेदना होईल अशा रितीने कोणतीही काळजी न घेता गाडी मध्ये कोंबुन जनावरांना क्रुर वागणुक देवुन कत्तली करीता नेत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी राम विठठल बोचरे, ने. पोस्टे बारड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे बारड** गुरन 48/2024 कलम 11(1)(ई),(ड),5(अ)1,5(अ)2,9 प्राणी छळ प्रतिबंधक अधिनियम कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/रायपल्ले, मो. नं. 9404366972** हे करीत आहेत.

## 6)प्रोव्हिबीशन :–

**1)मुक्रामाबाद :–** दिनांक 10.06.2024 रोजी चे 18.30 वा. चे सुमारास, **आरोपीचे घराचे अंगणात मौ. वळंकी ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभट्टी गावठी दारू किंमती 7000/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी मपोकॉ/226, लयखुनीसा पाशुमिया शेख, ने. पोस्टे मुक्रामाबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरनं 93/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2068 कागणे, मो.नं. 8459537419** हे करीत आहेत.

**2)रामतिर्थ :–** दिनांक 10.06.2024 रोजी चे 14.40 वा. चे सुमारास, **पाण्याचे टाकीजवळ मौ. हिप्परगामाळ ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 3840/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/180, संजय माधवराव शिंदे, ने. पोस्टे रामतिर्थ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतिर्थ** गुरनं 124/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2184 आलेवाड, मो.नं. 9765162644** हे करीत आहेत.

## 7)विद्युत शॉक लागुन मृत्यु :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 09.06.2024 रोजी चे 18.00 ते 19.30 वा. चे दरम्यान, **मौ. काकांडी ता. जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे वर्षाराणी विश्वनाथ बागल, वय 29 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. काकांडी ता. जि. नांदेड** हीने नळाला पाणी आल्याने मोटार लावण्यासाठी गेली असता विद्युत शॉक लागुन बेशुध्द पडल्याने तीस उपचार कामी स द विष्णुपूरी येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी मृत घोषीत केले. वगैरे **खबर देणार विश्वनाथ रावसाहेब बागल, वय 32 वर्षे, व्यवसाय शेती रा. काकांडी ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरून आ. मृ. **84**/2024 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1238 मुपडे, मो.नं. 9822441238** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड